जगभर

# अमेरिका-अफगाणिस्तान, Amnesty चा अहवाल, रशिया-युक्रेन

**चन्द्रशेखर पुरन्दरे**

११ सप्टेंबर २००१च्या अल-कईदाच्या हल्ल्यानंतर अल-कईदाला हुसकून लावण्यासाठी अमेरिकेने २५ सप्टेंबरपासून अफगाणिस्तानवर युद्ध लादले. अमेरिकेचे त्यावेळी जाहीर केलेले उद्दिष्ट - अफगाणिस्तानात लोकशाही आणणे, जेणेकरून परत अशा आतंकवादी शक्ती तेथे वाढणार नाहीत. [अमेरिकेने कोठेही लोकशाही आणण्याची वल्गना करणे हा क्रूर विनोदच पण मुद्दा तो नाही!] युरोपियन देशही त्या कारवाईत सामील झाले. या चढाईमुळे तलेबान राजवट त्या डिसेंबरमध्येच संपुष्टात आली पण तलेबानी अफगाणिस्तानात विखुरले आणि सक्रिय राहिले.

२००४ पासून लोकशाही निवडणुका होत राहिल्या. नंतर अमेरिकेने पाकिस्तानात जाऊन बिन लादेनची मे २०११ला हत्या केली.

म्हणजे, २००१ ते २०११ या दहा वर्षांनंतर अमेरिकेचे तेथील वास्तव्य त्यांच्याच आधीच्या उद्दिष्टानुसार आवश्यकच नव्हते. जी काही नाममात्र असेल पण लोकशाही आली, तलेबानचे सत्तेवरून तरी उच्चाटन झाले, अल-कईदा पडद्याआड गेली. मग जाहीररीत्या तलेबानचे देशातील विस्तार आटोक्यात आणण्यासाठी, अफगाणिस्तानातील सामाजिक परिस्थिती सुधारण्यासाठी हे वास्तव्य राहिले. वस्तुत: हे उद्दिष्ट यशस्वी होणे पहिल्या दिवसापासून अशक्य होते. त्याचे प्रमुख कारण म्हणजे तलेबानचे नियंत्रण पाकिस्तानातून होते. पण पाकिस्तानवर अमेरिकेने कधीच लक्ष केंद्रित केले नाही. प्रयत्न झाला तो दृश्य तलेबानच्या फुटीर, हिंसक कारवाया स्थानिक पातळीवर मर्यादित करण्यात. दुसरे कारण म्हणजे, अफगाणिस्तानाला लोकशाही परंपरा नाही. मध्ययुगीन मानसिकतेत अडकलेल्या देशात स्त्री-स्वातंत्र्य, लोकशाही या संकल्पना रुजणे १०-२० वर्षात शक्य नाही. त्यात अमेरिका ही परकीय शक्ती. सिकंदरापासून आजवर अनेक आक्रमणे त्या देशाने रिचवली आहेत.

आणखी एक महत्त्वाचा घटक म्हणजे, अमेरिकेने 'वरून खाली' सरकार स्थापण्याचा प्रयत्न केला. पाकिस्तानच्या हस्तक्षेपाने असेल किंवा अल-कईदाच्या प्रभावाने असेल, पण तलेबान ही 'खालून वर' येणारी चळवळ राहिली. त्यामुळे काबूलमधील सरकार हे अमेरिकेचे बाहुले आहे या त्यांच्या प्रचारात लोकांना तथ्य वाटले. त्याला अनुषंगिक मुद्दा म्हणजे सध्या चालू असलेल्या अफगाण सरकार व तलेबानमधील वाटाघाटी. त्या वाटाघाटी चालू असताना तलेबानच्या हिंसक कारवाया त्यांनी अनेकदा तसे आश्वासन देऊनही थांबल्या नाहीत. आता तर त्यांना पैलतीर दिसू लागल्यावर थांबणारही नाहीत.

दरम्यान अमेरिकेचे अडीच-तीन हजार सैनिक मृत्यू पावले, २ ट्रिलियन डॉलर्स खर्च झाला, [एक ट्रिलियन म्हणजे एकावर १२ शून्ये, अधिक डॉलर ते रुपयांसाठी २ शून्ये]. आजमितीला अफगाणिस्तानातील केंद्र सरकार अतिशय दुबळे आहे, त्यांचा अंमल जेमेतेम काबूल या राजधानीवर चालतो. तेथेही तलेबान बॉम्बस्फोट करत असते. इतरत्र तलेबान मोठा भूप्रदेश बळकावत आहे.

अफगाणिस्तानच्या प्रश्नाला अफूच्या व्यापाराचा महत्त्वाचा पैलू आहे. हे मादक द्रव्य अनेक प्रक्रिया करून युरोपमध्ये येते. अफूची लागवड बंद करण्याचा प्रयत्न या कारवाईदरम्यान ब्रिटनने केला. ब्रिटन नाटोचा सभासद आणि अमेरिकेच्या खांद्याला खांदा लावून जरूर नसताना या युद्धात उतरला. त्यावेळी ब्रिटनच्या एक मंत्री - क्लेअर शॉर्ट - अफूची लागवड नष्ट करण्याच्या मोहिमेवर अफगाणिस्तानला आल्या. त्या आल्या तेव्हा अफूचे पीक सहा प्रांतात येत असे, ते आता २६ प्रांतात येते. तो आज २.३ बिलियन डॉलर्सचा उद्योग आहे. [एक बिलियन म्हणजे एकावर नऊ शून्ये]. तो व्यापार तलेबानचा खर्च चालवतो.

म्हणजे या युद्धाची निष्पत्ती देशाची परिस्थिती बदलण्यासाठी साशंक ठरते. झाला तो विध्वंसच.

शक्य अपवाद स्त्रियांच्या परिस्थितीचा. तो प्रमुख उद्देश नव्हता, पण तलेबानच्या अस्तानंतर स्त्रियांची परिस्थिती सुधारली. आधी मुलींचे शालेय शिक्षणही तलेबानला अमान्य होते. मग उच्च शिक्षण, नोकऱ्या दूरच. घराबाहेर अगदी दुकानात खरेदी-साठी जायचे तर पुरुष बरोबर असणे आवश्यक होते. त्यातून

मोकळीक मिळाल्यावर एक फरक पडला. तो आकड्यात सूक्ष्म असेल पण गुणात्मक महत्त्वाचा - तो म्हणजे व्यवसायिक स्त्रीवर्गाचा उदय. पोलीस, वकील, शिक्षिका, पत्रकार इत्यादी. या व्यावसायिक स्त्रियांना वेचून ठार मारण्याचे प्रकार अलीकडे वाढले आहेत.त्यात अमेरिकेच्या पाय काढता घेण्याने भर पडणार. गेल्या सहा महिन्यातच ३०० हून अधिक स्त्रियांनी पत्रकारिता सोडली आहे.या स्त्री स्वातंत्र्यावर गदा येणार.

फक्त अफगाणिस्तानात नाही, तर नजीकच्या देशांतसुद्धा अमेरिका, नाटो बाहेर पडण्याने समस्या निर्माण होणार. एकदा अमेरिका तेथून हलली की तलेबानला कुरण मोकळे होईल. अफगाणिस्तानच्या स्वत:च्या लष्कराला तलेबानला आवाक्यात आणणे शक्य नाही. मग पाकिस्तानातही मूलतत्त्ववादी इस्लामचा प्रभाव आणखी वाढेल. हा आदर्शवाद निर्याती माल असल्याने अर्थातच भारताला त्याचा धोका आहे. तसेच इतर देशांकडे अफगाण निर्वासितही परत सुरू होतील, विशेषत: पाकिस्तान, इराण व युरोप.

दुसरी आर्थिक महत्त्वाची शक्यता म्हणजे, चीनचे व्यापारी हस्तक्षेप अफगाणिस्तानात सुरू झाले आहेत, ते वाढतील.

एकूण हे अस्थिर राष्ट्र आणखी अस्थिर होण्याची प्रक्रिया अमेरिका व युरोपच्या निर्गमनामुळे वेग घेईल असे दिसते.

**Amnesty चा अहवाल**

Amnesty International या आंतरराष्ट्रीय स्वयंसेवी संघटनेचा २०२०/२१ चा अहवाल आला आहे. ही संघटना जगभरच्या मानवी हक्कांची नोंद घेते. तो अहवाल व इतर कोविदसंबंधी अभ्यासांवर लेख आधारित आहे.

जगाचे मागील वर्ष कोविदच्या छायेत गेले. सुमारे १८ लाख लोक मरण पावले. अन्नाचे दुर्भिक्ष्य असणाऱ्यांची संख्या दुपटीने वाढली - २७ कोटी झाली. हातावर पोट असणाऱ्यांची उपजीविका गेली. भारतातील स्थलांतरित मजूर परत गावाकडे रवाना होऊ लागले. लेख लिहिण्याच्या वेळी दुसऱ्यांदा. सरकारला या ओघाची कल्पनाही नव्हती आणि त्यासाठी सरकारने वेळेवर मदतही केली नाही. श्रीमंत राष्ट्रांनी लशीचा अवाजवी साठा केला व औषध कंपन्यांनी Intellectual Property Rights या आणीबाणीच्या काळात मोकळे केले नाहीत.

बहुतेक देशांत वंचित समूह आधीच व्यवस्थात्मक शोषणाचे व विषमतेचे बळी असतात. त्यात भर पडली. ते आणखी परिघाबाहेर फेकले गेले. त्यांचे शोषण ज्या कारणांनी होत असे ती तीव्र झाली. गरीबी, वंश-वर्ण-जात, स्त्री-पुरुष भेद आणि इतर अनेक कारणे.

एक उदाहरण म्हणजे ईशान्य भारतातील लोकांना उर्वरित भारतात दिली जाणारी सापत्न वागणूक. त्यांना आधीपासूनच वांशिक छळ सोसावा लागतो. [आसाम, मणिपूर, मेघालय, नागालँड वगैरे] हे छळ विविध प्रकारचे असतात - भाड्याने जागा न मिळणे, रेस्टारन्टमध्ये प्रवेश नाकारले जाणे, येता-जाता कुचेष्टेच्या कॉमेंट्स ऐकणे, वगैरे. या प्रकारात कोविद दरम्यान भर पडली. या नागरिकांना करोना व्हायरस असे संबोधले जाऊ लागले. मागील एका लेखात करोनाच्या उदयानंतर चीनमधील आफ्रिकनांना घरमालकांनी रातोरात बाहेर काढण्याचा उल्लेख केला होता, तोच प्रकार भारतात. प्रश्नाला उत्तर मिळत नाही हे लक्षात आले की 'बाहेरच्यांवर' राग काढणे. ही पोरकट, हिणकस प्रवृत्ती अशा वेळी विशेष दिसते.मग 'बाहेरचे' परप्रांतीय असोत, परधर्माचे असोत. [राज ठाकरेसाहेब, ममतामॅडम] ईशान्येचे रहिवासी तर दृश्य 'बाहेरचे'.

परक्यांना गुन्हेगार मानण्याच्या या वृत्तीची जास्त झळ बसली ती निर्वासितांना आणि अंतर्गत स्थलांतरितांना. त्यांना कोणीच वाली राहिला नाही.

मानवी हक्कांची आणखीच गंभीर पायमल्ली झाली. वैध निषेधाचे मार्ग खुंटले. सरकारांची digital देखरेख वाढली.

देशोदेशीच्या lockdown दरम्यान आरोग्यसेवेतील आणि इतर अत्यावश्यक सेवेतील कर्मचाऱ्यांना त्रास देण्याचे प्रकार अनेक देशांत घडले. ज्यांनी कामाच्या परिस्थितीविषयी, सुरक्षेविषयी उणीवा नजरेस आणल्या, त्यांना ताकीद देणे, प्रसंगी अटक व कामावरून काढणे असेही प्रकार झाले. सफाई कामगार, वाहतूक कर्मचारी, निम्न श्रेणीचे वैद्यकीय श्रमिक, पोलीस, अत्यावश्यक सेवेतील त्रुटी दूर करणारे, मृतांची अंतिम व्यवस्था लावणारे, इत्यादी आधीच कमी मिळकत असलेला वर्ग. त्यांचे काम वाढले, मोबदला त्याप्रमाणात वाढला नाही.

शिक्षणाचा ढांचा फक्त on-line असा झाल्याने विशेषत: गरीब मुलींवर अनिष्ट परिणाम झाले. गरीब वस्तीत इंटरनेट सतत उपलब्ध नसते, त्याचबरोबर घरकामही जास्त करायला

**(पान २३ वर)**

**(जगभर : पान १९ वरून)**

लागल्याने शिक्षणावर परिणाम झाला. शिकण्यासाठी लागणारी किमान जागा, शांतता घरात उपलब्ध नसते. लवकर लग्नाचे दडपण वाढू लागले, लैंगिक अत्याचारांची शक्यता व प्रसंग वाढले. एका अभ्यासानुसार १५३ मधील २८ टक्के मुलींकडे मोबाइल फोन नव्हते आणि कॉम्पुटरही नव्हता. या वातावरणात त्यांची मानसिक कोंडी झाली आहे. त्याबाबत बोलण्यासाठी मित्र-मैत्रिणी, शिक्षक यांच्याशी संबंधही राहिला नाही. घराजवळ इंटरनेट कॅफे, wi fi ची सोय त्यांना आवश्यक वाटते. [ही सुविधा यायला शतके जातील].

एकूण आंतरराष्ट्रीय अर्थसंस्थांचे व व्यापाराचे स्वरूप मूलतः बदलल्याखेरीज, राष्ट्र-राज्याचा पदोपदी होणारा गैर हस्तक्षेप थांबल्याखेरीज या संकटातून जग काहीही शिकणार नाही. कोविदच्या काळात जगातील अब्जाधीशांची संपत्ती वाढली, ती मात्र आणखी वाढेल.

**रशिया-युक्रेन**

सोविएत युनियनच्या विघटनाआधीचा देश परत निर्माण करण्याची पुतीनची महत्त्वाकांक्षा शाबूत आहे. २०१४ साली त्याने युक्रेन या सोविएत युनियनमधून बाहेर पडलेल्या स्वतंत्र राष्ट्राचा क्रायमिया प्रांत बळकावला. त्याविरुद्धच्या पश्चिमेच्या निषेधाला दाद दिली नाही व त्यांनी लादलेले व्यापारी निर्बंधही कस्पटासमान मानले. आता युक्रेनच्या सीमेवर मोठ्या प्रमाणात रशियन सैन्याची जमवाजमव चालू आहे. त्यामुळे चिंतित युक्रेनने अमेरिका, युरोप यांना मदतीची गळ घातली आहे. ते लखोट्यांच्या लढाई खेरीज फार काही करू शकतील [प्रत्यक्ष लष्करी हस्तक्षेप करणे] हे असंभवनीय आहे.अमेरिकेने नवीन निर्बंध आताच जाहीर केले आहेत, ते मुळात अमेरिकेच्या २०२०च्या निवडणुकीत रशियाने केलेल्या ढवळाढवळीसाठी. पण निर्बंधाच्या घोषणेची वेळ युक्रेनच्या तणावाशी संलग्न आहे. रशियाच्या सीमेला लागून असणाऱ्या युक्रेनच्या भागात रशियन भाषा बोलली जाते व तो प्रदेश रशियाला सहानुभूत असावा - या गृहीतावर प्रत्यक्ष युद्ध न करता त्यातील काही भाग रशियाच्या अंमलाखाली घेण्यात पुतीन यशस्वी होऊ शकेल.

http://www.art-non-deco.com
purandarearts.com
artnondeco@yahoo.co.uk